# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

(नॅक समिती तर्फे "अ" दर्जा प्राप्त )

शैक्षणिक विभाग (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव (का.) २४०३३३४ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३१२४, २४०३३३५
वि.का.अ. (का) (०२४०) २४०३२२४
Web Site-WWW.bamu.net
E-mail: bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)

संदर्भ : शैक्ष /संलग्न/२०१८/ 1958.

दिनांक ०९/०५/२०१८

**अति तात्काळ**

प्रति,
**प्राचार्य/प्राचार्या**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय :** - शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ साठीचा सम्यक योजना/बृहत आराखडा विकसित करणे बाबत..

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७
२) दि. ०५-०५-२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेली बृहत आराखडा सर्वेक्षण प्रश्नावली फॉर्म संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचारी, पालक, विदयार्थी यांच्यामार्फत ऑनलाईन किंवा हॉर्ड कॉपी मध्ये भरुन विद्यापीठाचे प्रतिनिधी यांच्याकडे सुपर्त करावा. उन्हाळयी सुट्टी असल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयातून किमान पन्नास (५०) विदयार्थ्यांकडून प्रश्नावली फॉर्म भरून घेण्यात यावे. १५ मे पुर्वी जमा करण्याचा असल्यामुळे याविषयी सहकार्य करावे हि विनंती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सम्यक योजना/बृहत आराखडा विकसित करण्यासाठी सोबत जोडलेल्या सर्वेक्षण प्रश्नावली प्रमाणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विदयार्थी, शिक्षक, पालक, संस्थाचालक, सामाजिक कार्यकर्ते, उदयोजक , संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, अधिसभा सदस्य यांच्या मार्फत सर्वेक्षण करून सादर केलेल्या अहवालानूसार बृहत आराखडामध्ये कार्यक्षेत्रातील सामाजिक, औद्योगिक व रोजगारभिमुख गरजा लक्षात घेऊन सामाजिक, औद्योगिक व रोजगारभिमुख गरजांची पुर्तता करणारा सम्यक योजना/बृहत आराखडा विकसित करावयाचा आहे. शिक्षणाचे समन्यायी वाटप, सर्वदुर विस्तार, काळाच्या गरजारूप शिक्षण देणे, विभागीय शिक्षण समतोल राखणे, विभागातील गरजानूरूप

शिक्षणाच्या सोई असणे इ. बाबत शासनाने मोठया प्रमाणावर सर्वेक्षण करून बृहत आराखडा तयार करावा असे धोरण शासनाकडून निश्चित केलेले आहे.

सदर सर्वेक्षण प्रश्नावली ऑनलाईन भरण्यासाठी www.bamu.ac.in या संकेतस्थळावरील Online Affiliation या विभागातील बृहत विकास आराखडा : २०१९-२० ते २०२३-२४ या लिंकवर उपलब्ध आहे.

**सोबत :-उपरोक्त प्रमाणे.**

**प्र- कुलगुरू**